. ग्र. स. टाण
काव्य
२११४.



# सूर्यात्

REFBK-0015572
REFBK-0015572

जवाहर मुथा

संदर्भ.
काव्य.
७८८२६
२.२.७३
२११४

# सूर्य-तनू

मराठी ग्रंथ संग्रहालय
95562

जवाहर मुथा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
88828 काव्य
2998 2.2.63

REFBK-0015572
REFBK-0015572

– प्रस्तावना –

शांता ज. शेळके

मिलिंद प्रकाशन गृह, अहमदनगर

द्वितियावृत्ती

२५ ऑगष्ट १९६६

चित्रकार

रमेश भारताल

मूल्य ५.५० ~~तीन~~ रुपये

प्रकाशक

मिलिंद प्रकाशन गृह

३७६७, नवीपेठ,

अहमदनगर

मुद्रक :

र. के. तांबोळी

मुद्रण स्थळ :

श्रीपाद मुद्रणालय

सेंट्रल बँक रोड

अंबिकानगर

"एस्ला"

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९५५६२

## एक सूर्याचे गीत

माझ्या जीवनातील प्रकाशाचा
(जर तो असेल तर)
तू सूर्य आहेस
(तू आहेच)

माझ्या जीवनाचा मार्ग
(जर तो असेल तर)
तूच मला दाखवणार
(हो! तूच)

मला कोण आहे (केवळ) तुझ्याशिवाय ?
तुझ्याजवळ तरी आहे(इतर)माझ्याशिवाय!

अवघ्या सात–आठ महिन्याच्या कालावधीत 'सूर्यतनू'ची दुसरी आवृत्ति निघेल असे स्वप्नातही वाटले नव्हते. स्वप्नभूमिपासून वास्तवता दूर असते, असेच याबाबतीत म्हणावे लागेल.

दुसऱ्या आवृत्तिचे सर्व श्रेय रसिकांना व सुहृदांनाच आहे. त्यांचे आभार तरी कसे मानावे ?

अहमदनगर
२५–८–१९६६

– जवाहर मुथा

# स्वागत !

दोन वर्षांपूर्वी मी अहमदनगरला गेले असता श्री. जवाहर मुथा नावाच्या एका कॉलेजच्या विद्यार्थ्याने भीत, भीत, संकोचाने आपल्या काही कविता मला वाचून दाखविल्या. एका मारवाडी युवकाने, मातृभाषा मराठी नसताना, मराठीत काव्यलेखन करावे या गोष्टींचे मला जेवढे आश्चर्य वाटले तेवढेच व्यापार, धंदा या गोष्टी ज्यांच्या रक्तातून वाहतात अशांच्या ज्ञातीत जन्मलेल्या या मुलाने काव्यरचनेसारख्या लाभशून्य, इतकेच नव्हे तर आतबटचाचा ठरणारा 'व्यापार' करावा या गोष्टींचेही मला नवल वाटले. पण मुथांचा थोडा परिचय झाल्यानंतर आणि त्यांच्याशी काही वेळ गप्पा मारल्यानंतर माझे ते दुहेरी आश्चर्य नाहीसे झाले.

मुथा हे जरी मारवाडी असले तरी बालपणापासून मराठी भाषिक शेजाऱ्यापाजाऱ्यांत ते वाढले आणि शाळाकॉलेजांत त्यांच्यावर संस्कार झाला तोही मराठी भाषेचा अन् मराठीं साहित्याचा. कॉलेजमध्ये शिकत असताना बी. ए ला आणि एम. ए. ला मुथा यांनी मराठी हाच प्रमुख विषय निवडला होता. बालपणापासून मराठी वातावरणात बावरणाऱ्या आणि

## सूर्यंतनू

कॉलेजमध्ये अभ्यासाच्या निमित्ताने जुन्या नव्या मराठी काव्याचे जीव लावून अध्ययन करणाऱ्या मुथांनी मराठी कविता लिहिण्याचा छंद जोपासावा यात नवल ते काय ? आज तेच जवाहर मुथा 'सूर्यतनू ' या आपल्या पहिल्यावहिल्या कविता संग्रहातून आपल्या ४० कवितांचे उपायन मराठी रसिकांना मोठ्या हौसेने आणि उमेदीने सादर करीत आहेत. त्यांच्या या कवितासग्रहाचे मी मनापासून स्वागत करते.

'सूर्यतनू ' हा संग्रह वरवर जरी चाळला तरी त्यात सर्वाधिक कविता 'प्रेम ' या विषयाला वाहिलेल्या आहेत हे ध्यानी येते. आणि हे असे असावे यात फारसे आश्चर्यही नाही. श्री. मुथा हे अजूनही पंचविशीच्या आतले असावेत असे मला वाटते. अर्थात या वयात प्रीतीसारख्या मादक भावनेचे मनाला मोठेच आकर्षण वाटावे आणि त्याच भावनेने कवितेतून वारंवार आविष्कृत होण्यासाठी धडपडावे हे स्वाभाविक आहे. तारुण्याच्या पहिल्या बहरात हृदय वेधणारी प्रीती, तिचे विविध विभ्रम, कोवळ्या भावनाभंगाचे तीक्ष्ण दुःख, त्या दुःखापोटीही प्रेयसीचे भलेच व्हावे ही मनात जागणारी उत्कट आशा हे सारे मुथांच्या प्रेमकवितांचे विषय आहेत. या प्रीतीचा हळवा, तरल, वरवरचा रंग टिपण्यात ते काही प्रमाणात यशस्वी झाले आहेत. कोठे 'कोमेजलेल्या गुलाबाची जखम ' ते जपताना दिसतात तर कोठे 'सलणारी याद जोपासली ' जाते. कोठे 'आठवणीचे दव' मनाच्या हिरवळीवर शांतपणे झिरपत असते तर कोठे 'चुंबन–निखारे ' जिवाला चटके देत असतात. कोठे 'मनात खोवलेला स्वर ' आसमंत भारून टाकतो तर कोठे 'रात्ररात्र जागलो मी, शिणल्या पापण्या ' असा श्रांत विकल मनोऽवस्थेचा सूर लागलेला असतो. या प्रेम कवितांपैकी बऱ्याचशा कविता या सामान्य पारंपरिक वाटतात. त्यात लक्षात राहण्याजोगे,

काळजाला भिडण्याजोगे फारसे काही सापडत नाही. अनेक ठिकाणी इतर प्रसिद्ध कवींच्या कल्पनांची किंवा शब्दांची छाया पडल्या सारखी वाटते. पण सर्वच कविता अशा आहेत असे मात्र नाहीं. मुथा जेव्हा काही वेगळया लकबीने अनुभव घेतात किंवा पारंपरिक कल्पनांचा आश्रय न घेता आपल्या भावनेला प्रामाणिक अभिव्यक्ति देण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांची कविता परिणामकारक होते तिच्या साधेपणात एक पीळ निर्माण होतो. आणि सच्चेपणाचा सूर तिला लाभतो.

'आज तुझा वाढदिन' ही एक अशी चांगली कविता ! येथें कवी आपल्या प्रेयसीला म्हणतो–

आज तुझा वाढदिन
काय देऊ भेट तुला ?
तुझ्या दुःखाच्या बदली
माझ्या स्वीकार सुखाला

... आज तुझा वाढदिन
काय भेट देऊ तुला ?
माझा उरला दिवस
लाभो तुझ्या आयुष्याला !

'आता काय तुझे माझे' हीही एक अशीच साधी तरीही उत्कट कविता आहे. ती इतकी चांगली आहे की ती संपूर्ण उद्धृत करावीशी वाटते. कविता अशी आहे

नको येऊस स्वप्नात
आता काय तुझे माझे
तुझा मादक मोगरा
माझे झाड बाभळीचे

नको येऊस घरात
आता काय तुझे माझे
तुझा काचेचा महाल
माझे घर चिमणीचे

नको बोलूस रस्त्यात
आता काय तुझे माझे
तुझ्या शद्बांना श्रीमंती
माझे अक्षर फुकाचे

'वचन' आणि 'मुग्धता' या दोन आणखी चांगल्या कविता. येथे चार चार ओळीत कवी बरेच काही सांगून गेला आहे. 'वचन' कवितेत तो म्हणतो–

माझे अंग पवित्र ठेवीन
त्यावर तुझा स्पर्श आहे
माझे शब्द मौन असतील
तुला वचन दिले आहे

तर 'मुग्धता' या कवितेत तो उद्‌गार काढतो–

नको मला शब्दजाल
मुग्धताच बरी
पाकळीच्या गंधातली
अबोलता खरी !

या कवितांवरून असे दिसून येते की, जेव्हा मुथा हे आपल्या अनुभूतींचा प्रामाणिक आविष्कार करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांची शैली अकृत्रिम स्वाभाविक बनते, तिला स्वतःची अशी एक लय प्राप्त होते. तिच्यात एक सामर्थ्य निर्माण होते. थोडक्यात ती खरी अस्सल बनते. या प्रकारच्या कविता मुथांच्या वाङ्‌मयीन भवितव्याविषयी मनात आशा आणि विश्वास निर्माण करतात.

प्रेमकाव्यानंतर मुथांच्या इतर कवितांकडे वळल्यास तेथे मात्र मनाला वेधून घेणारे असे फार थोडे सापडते येथे अर्थात विषयांची विविधता मला अभिप्रेत नाही. राजकारण, समाज–कारण, राष्ट्रावरील आक्रमण असे विषय मुथांनी कवितेत आणावयाला हवे होते असे मला म्हणावयाचे नाही. मला 'विविधता' शब्दाने जे सुचवायचे आहे ते वेगळे आहे. आजच्या बहुरंगी गतिमान् आणि समृद्ध तरीही केविलवाण्या जगात वावरताना माणूस आणि त्याचा भोवताल यांचा एकमेकाशी क्षणोक्षणी संपर्क घडत असतो. हा संपर्क कधीकधी हातघाईला येऊन संघर्षाचे रूप धारण करतो. आणि या संघर्षातून उडणाऱ्या ठिणग्या मनात सारख्या चमकत राहतात. संवेदनशील कविमनाला या ठिणग्या जाणवल्या पाहिजेत. त्यांचा चटका त्याला लागला पाहिजे. आणि त्याच्या काव्यातूनही त्यांचा आढळ कोठेतरी झाला पाहिजे. या दृष्टीने मुथांचें काव्य वाचले तर पदरी निराशाच येते. जीवनाचा खोलपणा, त्याची भव्यता, गूढता आणि संमिश्रता याची त्यांना क्वचित जाणीव होते.

रात्रीच्याच सुगंधात
जळे अग्निशिखा
राखावल्या धुरातून
आरवते उषा

हा साक्षात्कार एखादे वेळी होतो. ईश्वराच्या हिरव्या राईत आपला रंग सरत नाही आणि सृष्टीच्या जलधारेत आपले मन तुषार होत नाही हा मानवाचा एकाकीपणाही क्वचित त्यांच्या मनाला दंश करून जातो पण या भावनेतले वरवरचे हलके फुलके दुःखच ते गोंजारत राहतात या डोहात सूर मारण्याची किंवा त्याचा तळ गाठण्याची जिद्द ते सहसा दाखवीत नाहीत. त्यामुळे–

'धन्य तुझी आता देवा
ब्रम्ह माझ्याशी बोलेना'

अशा ओळी किंवा

'खूण राहू दे व्रणाची रक्त सारे वाहु दे
स्वैर चुकल्या पाखराला घुंगुरांचे गीत दे'

यासारख्या ओळीतला आवेश हा खोटा, उसना वाटू लागतो. त्या पलिकडच्या भाववृत्तीला कवी सहसा भिडताना दिसत नाही.

मुथा यांची शैली अद्याप नीटस, रेखीव झाली नाही. तिचे स्वरूप संदिग्ध अनिश्चित आहे. 'आभाळले', 'मौनावले' या सारख्या नामधातूंचा वापर ते केवळ तशा शद्बांच्या प्रेमामुळेच करतात की काय अशी शंका येते. 'वेदनेचा वेद', 'ब्रम्ह माझ्याशी बोलेना', 'एक आणू रंग' या सारख्या शद्बसंपत्तीतून मधुकर केच्यासारख्या कवींच्या तत्सदृश शद्बसंहतीची आठवण होत राहते. शाद्बिक सैलपणा एकवेळ चालेल पण व्याकरणदुष्ट रचना अवश्य टाळली पाहिजे हेही पुष्कळदा मुथांना सांगावेसे वाटते.

हे सर्व खरे आहे, पण त्याबरोबर मुथांचे काव्यप्रेम आणि काव्य रचनेची त्यांची जिद्द हीही खरीच आहे. मला त्यांच्या कवितेतील दोष आणि उणीवा क्वचित खटकल्या असल्या तरी शेवटी मनावर ठसा उमटून राहतो तो या निर्मळ काव्य प्रेमाचा आणि काव्य लेखनाच्या जिद्दीचाच.

ते प्रेम आणि ती जिद्द सतत सांभाळावी हेच श्री. जवाहर मुथा यांना माझे आपुलकीचे सांगणे आहे.

मुंबई
१४।११।६५

—शांता ज. शेळके

# अनुक्रम


| | |
|---|---|
| सर्वस्व | |
| विधिघटना | २ |
| ते पत्र वाचितो | ३ |
| सल | ५ |
| अर्पण | ६ |
| सूर्यतनू | ७ |
| एक आणू रंग | ८ |
| वर्षानंतर | ९ |
| मध | ११ |
| जाणकार | १२ |
| रात्र | १३ |
| माझे शिवेन आभाळ | १४ |
| भंगलेला खेळ | १५ |
| सोबत | १६ |
| आज तुझा वाढदिन | १७ |
| निरोप | १८ |
| देव | १९ |
| कोजागिरी | २० |

| | |
|---|---|
| कितीं मोकळचा मनाने | २१ |
| खुशाल निघून जा | २२ |
| आता काय तुझे माझे | २४ |
| अबोली | २५ |
| येणार | २६ |
| वचन | २७ |
| वेद | २८ |
| मत्स्य | २९ |
| नको | ३० |
| ब्रम्ह माझ्याशी बोलेना | ३१ |
| नको स्नेहल पदर | ३२ |
| ऋतु पावस आला ना | ३३ |
| सोहळा | ३४ |
| रक्त सारे वाहू दे | ३५ |
| गझल | ३६ |
| सौंदर्य | ३७ |
| तुझा मी असूनि | ३८ |
| कथा | ३९ |

७८८२८ नाव
२११४ ५४५७३



## सर्वस्व

सर्वस्व दिले मी तुला
त्यामध्येच मी रंगलो
तुज देता देता सारे
माझा न कधी राहिलो

ते मुक्त हास्य चंद्राचे
मी हळु दिले तव ओठी
ते गान मधुर प्रीतिचे
मी हळू गाईले कानी

ते रंग गंध बावरे
वेणीत तुझ्या खोवीले
मधुभाव फुलांचेहि
नैनात तुझ्या राहिले

मी दिला कधीही नाही
त्वद्शब्द कळीचा पडू
तू म्हटले, 'ये, फुलाया'
मी हळूच म्हटले, 'फुलू'

सर्वस्व दिले मी तुला
माझा न कधी राहिलो
तुज देता देता सारे
त्यामध्येच मी रंगलो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५६२
शाखा ... प्रत

## विधिघटना

तू मागे म्हणाली होतीस
मला काही सांगायचे आहे
मीहि मागे म्हणालो होतो
मला काही ऐकायचे आहे...

...त्यानंतर आज पुन्हा
आपण दोघे भेटत आहोत
तुला काही सांगायचे नाही
पण मी मात्र विचारणार आहे :
कोठे तुझे ते शब्द...
सांगावयाची होती पण न सांगितलेली
कुठे लपविली ती गोष्ट...

...विचारल्यानंतर
तू काही बोलली नाहीस
हळूच मान खाली घालून
निघून गेलीस गुपचुपपणे...

मी मात्र आजहि हळहळतो
तुला सारं ऐकवलं म्हणून
न सांगता ऐकलं म्हणून...

## ते पत्र वाचतो

मी कधी वाचितो
पुन्हा पुन्हा ते पत्र
गतकाळाचे अन्
सरून जाते चित्र

ते दृश्य आठवे
पुनवेच्या रात्रीचे
ते रूप आठवे
ओघळत्या चंद्राचे

तो भाव कराचा
अजून अजून सलतो
तो स्पर्श मनाच्या
कप्यामध्ये दुखतो

ते कुंतल काळे
अजून भुरभुरताहे
ते हास्य लाघवी
अजून स्मरते आहे

तो बंध तनुचा
अजून ओला आहे
तो स्वर हुंकारी
मनी खोवला आहे

गतकाळ कोरितो
मोरपिसाचे चित्र
मी कधी वाचितो
पुन्हा पुन्हा ते पत्र

## सल

एक तुझी आठवण
मला अजून सलते
उमलत्या गुलाबाची
जखम अजून दुखते

रुतलेला एक काटा
म्हणूनच गहिवरतो
व्रणाची याद येऊन
व्रणच सारखा रडतो

दिलेली तुझी जखम
तरीहि मी सांभाळतो
सलणारी तुझी याद
मी जोपासून ठेवतो

## अर्पण

स्वप्नाच्या समाप्तिवेळी
अंधुकते उषा
वेंडावल नदी-काठ
पाणावते रेषा

जरतारी लाल वस्त्र
वेडावते पुन्हा
काळोखाच्या रात्रीतला
आठवतो गुन्हा

ढवळत्या हृदयात
उचंबळे लाट
चुंबनाच्या निखाऱ्यात
जळते पहाट

धुक्यामध्ये हारवते
हीच ती पहाट
जगण्यासाठी शोधतो
मी ती ही वाट

# सूर्यतनू

एकलाच मी
अजूनि आहे
आकाशाचा
चंद्र जणू

एकलाच मी
भासतसे जग
तुझिया प्रेमी
इंद्रधनू

एकलाच मी
मीच एकटा
तुझ्याच साठी
पुष्प जणू

त्या पुष्पाची
एक पाकळी
बनून गेली
सूर्यतनू

## एक आणू रंग

एक आणू रंग आणि
खेळ खेळू खूप
दोन आणू रंग आणि
नाचूं सूप सूप

तुझ्या माझ्या मध्ये फक्त
रंगाचा पडदा
रंगातच न्हाऊ आणि
करू दिड्दा दिड्दा

एक आणू रंग आता
दोन आणू रंग
माखूनिया रंगामध्ये
पिऊ सारी झिंग.

## वर्षानंतर

अनेक वर्षानंतर
भेटतांना म्हणालीस–
काहीच नाही बोलून
बरेच काही बोललीस . .

नजरांच्या नजरेत
आठवणीचे दव होते
भिजलेल्या मनांनी
टिपलेले क्षण होते

हरवती वाट होती
धुंदलेली रात होती
चांदण्याच्या आकाशात
रजनीची प्रीत होती

भांडणाचे शब्द होते
शपथेचा व्रण होता
दुरावल्या संगतीत
सलणारा जीव होता

व्याकुळते मन होते
अतृप्त तृप्ती होती
जीवनाच्या सागरात
रडणारे थेंब होते....

अनेक वर्षानंतर
भेटतांना म्हणालीस...
नजरांच्या नजरेत
बरेच काही बोललीस ...

## मध

जर तुझ्या मनामध्ये
भाव फुलाचा असता
मधाचा मिठ्ठासपणा
शब्दात आला नसता ?

## जाणकार

तुला कसे सांगू गूज
गूढ माझे उकलेल
मनातील भाव नवे
काही–बाही बोलतील

तुझ्यासवे कसे बोलू
शब्द फितूर होतील
अक्षराच्या जाळ्यामध्ये
मजला तू धरशील

तुला कसे लिहू पत्र
शब्द कसे सुचणार
मनातील भावनांचा
शोक कसा ऐकणार ?

तुला कसे सांगू सारे
मला नाही जमणार
नयनीचे अश्रू ओले
जाण तूच जाणकार

## रात्र

रात्र रात्र जागलो मी
शिणल्या पापण्या
रात्रीच्याच अंधारात
उसवल्या वेण्या

रात्रीच्याच सावलीत
आभाळली वाट
काळचा काळचा खोल डोही
काळोखाचा नाट

रात्रीच्याच दीपामध्ये
तेजाळला जीव
रात्रीच्याच शालीमध्ये
गारठयाची कीव

रात्रीच्याच सुगंधात
जळे अग्निशिखा
राखावल्या धुरातून
आरवते उषा

# माझे शिवेन आभाळ

जाई कोमेजली होती
स्वप्ने विरलेली तेव्हा
करपली होती आशा
गेली निघून तू जेव्हा

बाग बहरेल माझी
होते वाटले किनारी
तुजवीण आता काय
माझे उरले संसारी ?

तुझे बासरीचे स्वर
माझे होते रे जीवन
तुला कोठे आता शोधू
किती फिरू वणवण

कोमेजल्या जाईचाच
आता करेन सांभाळ
विरलेल्या स्वप्नामध्ये
माझे शिवेन आभाळ

## भंगलेला खेळ

तुला खेळायचे होते
फक्त खेळ माझ्यासवे
आणि खुडायाचे होते
फूल यौवनाचे नवे

तुझा साधला तू डाव
आणि संपविला मेळ
तरी वेड्यावाणि पुन्हा
मांडिला मी नवा खेळ

रोज बघतो मी वाट
तरी काही तू येईना
भंगलेला खेळ माझा
पुन्हा मांडला जाईना

तुला खेळायाचे होते
फक्त खेळ माझ्यासवे
आता कोण खुडणार
वार्धक्याचे फूल नवे ?

## सोबत

किती दमलो तरीहि
तुझ्या दर्शनाची प्यास
किती डुंबलो तरीहि
तुझ्या दर्शनाची आस

पहा कितीहि परीक्षा
उभा राहू दे उन्हात
मंदिराच्या कळसाची
मला तेव्हढी सोबत !

# आज तुझा वाढदिन

आज तुझा वाढदिन
काय देऊ भेट तुला
तुझ्या दुःखाच्या बदली
माझ्या स्वीकार सुखाला

दरवळू दे मोगरा
तुझ्या सदैव संसारी
असो सुखाचे तोरण
तुझ्या मांगल्याच्या दारी

अत्तराच्या सुगंधात
तुझ्या न्हाऊ दे घराला
वैभवाच्या दिप्तीमध्ये
उजळू दे अंगणाला

आज तुझा वाढदिन
काय भेट देऊ तुला
माझा उरला दिवस
लाभो तुझ्या आयुष्याला

# निरोप

अखेरची ती भेट आठवे
पाणवलेल्या नयनांनी
जेव्हा होते करात कर गे
थरथरलेल्या स्पर्शांनी

शब्दामध्ये कुंदपणा नि
ओठामध्ये पिंपळपान
जराजराशा स्पर्शामध्ये
व्याकूळलेले अबोध गान

गालावरती विर्घळणारी
लाख स्मृतींची अश्रूधार
निःश्वासाच्या शून्यामधूनि
कभिन्न काळा भविष्यभार

कंपित अस्फुट शब्दामध्ये
बोलून गेली तू रामायण
अर्ध्या मुर्ध्या नजरेमध्ये
पुन्हा विसरलो माझे मी पण

अखेरची ही भेट आठवे
सुगंधातले लेवून लेणे
कळे न माझ्या मनात काही
कोठे जाणे... कोठे नेणे

# देव

जर तुझ्या नजरेत
 अविश्वासाचे धुके नसते
तुझी नजर केव्हाच
 देवदृष्टी झाली असती

जर तुझ्या मनामध्ये
 धोक्याचा निःश्वास नसता
तुझे अवघे जीवन
 देवरूप झाले असते

तू जर अशी
 तशी नसतीस
खरेच तुला सांगतो
 देव झाली असतीस

# कोजागिरी

आज कोजागिरी पिऊ
आणि चांदण्यात न्हाऊ
रंग-गंधाच्या गळ्यात
आज निसर्गाला गाऊ

मंत्रबद्ध मध्यरात्र
तुझ्यामाझ्यासाठी आज
रातराणीच्या गंधाला
तुझ्या संगतिचा साज

आज बसू नयनात
घेऊ मायेची सावली
चांदोबाची चिरेबंदी
आज बांधूया हवेली

जाळू रात्रभर मन
कोजागिरीला तेववू
रंग-गंधाच्या गळ्यात
दीप आकाश आळवू

# किती मोकळ्या मनाने

किती मोकळ्या मनाने
आलो जवळ आपण
निशीगंधाच्या फुलात
किती रमलो आपण

किती मोजल्या चांदण्या
अवकाशात पाहून
अक्षरहि न बोलता
किती जागलो आपण

किती हासलो, खेळलो
नजरेच्या काठावर
किती घातली मी शीळ
फाटकाच्या खुणेवर

परस्परावर तू मी
किती रुळलो, भाळलो
टाका उसवून आज
परी हाय दुरावलो !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १५५८२
संग्र

## खुशाल निघून जा

तुला जर जायचे आहे
खुशाल निघून जा
उमटविलेला व्रण मात्र
हळूच पुसून जा

शब्दातला अर्थ तुझा
परत फिरवून घे
संगतीच्या निखाऱ्यावर
राख टाकून दे

तुला जर जायचे आहे
खुशाल निघून जा
गालावरची खूण मात्र
इथेच हरवून जा

चांदण्यातल्या गच्चीतले
विरून टाक पाऊल
नजरांच्या कळ्यातील
कुस्करून टाक चाहूल

तुला जर जायचे आहे
खुशाल निघून जा
मी दिलेले माझे तुला
सारेच देऊन जा

उमटविलेला व्रण आणि
इथेच पुसून जा
तुला जर थांबायचे नसेल
खुशाल निघून जा

# आता काय तुझे माझे

नको येऊस स्वप्नात
आता काय तुझे-माझे
तुझा मादक मोगरा
माझे झाड बाभळीचे

नको येऊस घरात
आता काय तुझे-माझे
तुझा काचेचा महाल
माझे घर चिमणीचे

नको बोलूस रस्त्यात
आता काय तुझे-माझे
तुझ्या शब्दांना श्रीमंती
माझे अक्षर फुकाचे

## अबोली

नाहीच ना तुला आता
माझ्यासवे बोलायचे
आहेच ना तुला आता
अनोळखी रहायचे

एक विचारू मग मी
कशाला रे आलास ?
फुलायचेच नव्हते
तर कळी का झालास ?

पुन्हा फक्त विचारते
नाहीच ना बोलायचे
कर तर मग मला
फूल एक अबोलीचे !

... ग्रंथसंग्रहालय, ठाणे. ...
७९९२० वि: काव्य
२११४ दि: 2.2.७३

# येणार

येणार जर असशील
कळवूनच येत जा
निष्कारण उगी नको
पाऊस मला वळवाचा

येणार जर असशील
हलकेच नको येऊस
कुठल्या कुठे उडून जाईल
भेटीतला कापूस

येणार जर असशील
घड्याळाची ऐट नको
टाइमाच्या बंधनात
मला तुझी भेट नको

## वचन

माझे अंग पवित्र ठेवीन
त्यावर तुझा स्पर्श आहे
माझे शब्द मौन असतील
तुला वचन दिले आहे

# वेद

थट्टेथट्टे मध्ये
तू गेली रडून
आकाशाचा जीव माझा
तसाच गेला फुटून

तुझा एकेक अश्रू
बनून गेला मोती
माझा वेदनेचा वेद
वेधून गेला माती

तीच एक जखम ओली
आता माझी राहिली आहे
विरलेली संध्याकाळ
वेद बनून राहिली आहे

## मत्स्य

न कळत माझे ओठ
गेले काही बोलून
डोळयातून चंद्र–तारे
तुझ्या गेले वाहून

पापण्यांच्या तलावात
भाव राहिला भिजून
आकाशाचा जीव माझा
मत्स्य गेला बनून

## नको

नको मला शब्दजाल
मुग्धताच बरी
पाकळीच्या गंधातली
अबोलता खरी

# ब्रम्ह माझ्याशी बोलेना

तुझ्या जीवाच्या आकाशी
माझा चंद्र रे मावेना
तुझ्या मनाच्या सागरी
माझी लहर जमेना

तुझ्या हिरव्या राईत
माझा रंगही सरेना
तुझ्या जलधारेमध्ये
मन तुषार होईना

तुझ्या अफाट विश्वात
मला कोंदण मिळेना
धन्य तुझी आता देवा
ब्रम्ह माझ्याशी बोलेना

## नको स्नेहल पदर

नको देऊस सुखाचे
दोन क्षण जीवनात
नको अत्तराचा फाया
माझ्या कुंदल्या मनात

नको क्षणहि विसावा
फांदिवरल्या फुलाचा
नको स्नेहल पदर
रंग टिपत्या मनाचा

आता जीवनात माझ्या
फक्त असू दे उसासे
नयनीचे ओले अश्रू
त्यांना देतील दिलासे

# ऋतु पावस आला ना

किती पाहू सख्या वाट
अजूनहि तू येईना
माझ्या थकल्या जीवाची
मला चैन गवसेना

किती शोधू मी किनारे
किती आळवू गीतांना
माझ्या भाव सागराचे
काही वादळ शमेना

माझ्या नेत्रातील दीप
किती पाजळू कळेना
माझ्या जीवाच्या सख्या रे
ऋतु पावस आला ना...

# सोहळा

किती गाऊ तुझ्यासाठी
तुकारामाचे अभंग
किती नाचु तुझ्यासाठी
घामाळून अंग अंग

किती घोष करू तुझा
किती वाजवू चिपळ्या
तुझे नाम घेता घेता
माझा संपू दे सोहळा

# रक्त सारे वाहू दे

खूण राहू दे व्रणाची रक्त सारे वाहू दे
स्वैर चुकल्या पाखराला घुंगुरांचे गीत दे

जीव जावो प्राण जावो प्रीतिचे संगीत दे
दोन भरल्या अश्रूमध्ये संगतिचा गंध दे

दिव्यता जावो लयाला भव्यता जाळो जगी
एक होऊ दे तनाला नम्रतेची संमति

देह खंगू दे जळो वा अंतरीच्या यातना
प्रीतिच्या रंगात माझ्या डुंबू दे या वेदना

## गझल

घे सुखाची ज्योत माझी काजळी घेऊ नको
गंध घे तू पाकळीचा व्रण काट्याचा नको

दुःख हे येणार हाती कल्पना होती मला
या करांचा स्पर्शसुद्धा या पुढे घेऊ नको

स्वप्न माझ्या जीवनाचे भंगलेले ते निळे
तू कशाला दोष घेते दोष तू घेऊ नको

पुष्परंगी प्रीत माझी जा खुळी विसरून तू
छंदला संसार तुझा आठवू मजला नको

धुंद येऊ दे घराला रंग तुझ्या कामिनी
बहरत्या रंगात माझे नाव तू घेऊ नको

## सौंदर्य

पारिजातकाच्या नादी
नाही लागणार पुन्हा
रंगामध्ये झिंगण्याचा
नाही करणार गुन्हा

नाही तोलणार गंध
गुलाबाच्या पाकळीत
मोजणार भक्ति नाही
आता देवाच्या दारात

इंद्रधनुष्याचे भिंग
नाही पाहणार कधी
सौंदर्यात फक्त आता
शोधणार नाही प्रीति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थानग्रंथ
क्रमांक ८८८२७ वि: काव्य
अंक २११६ नों. दि: २.२.८३

## तुझा मी असूनि

तुझा मी असूनि
तुझा नच झालो
सांगू न शकलो
कसा हारवलो

तुझी होती रात्र
तुझी रातराणी
सुगंध न गाणी
विरही पापणी

तुझा मी असूनि
तुझा नच झालो
पाहू न शकलो
कसा दुरावलो

## कथा

तुझ्या प्रीतिच्या ओठामध्ये
हसली क्षणभर व्यथा
संपली तेथे माझी कथा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
८८८२८ काव्य
२११४ ५२८७३
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५८२
REFBK-0015572
REFBK-0015572

या पुस्तकातील काही कविता वाचून दाखविलेल्या आम्ही ऐकल्या. या कविता रसाळ असून त्यात अनुभवांची प्रतीति आहे. कविता अशाच गाजोत व लोकांचे रंजन होवो असे म्हणतो.

—गिरीश

★

श्री. जवाहर मुथांच्या काव्यश्रवणाने मला आनंद वाटला. कवितातील शब्द-योजना समर्पक असून विचार आर्त आहेत. श्री. मुथा यांनी काव्यलेखन-व्यवसाय असाच चालू ठेवावा. ते एक चांगले कवि होतील असा विश्वास वाटतो.

—काव्यविहारी